जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -** **दिनांक - ११/०१/२०२४**

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## कोंम्बींग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंम्बींग ऑपरेशन कारवाई दरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार टोळया, रायझींग गँग, जातीय तेढ निर्माण करणा-या व्यक्ती, समाजविघातक कृत्य करणा-या संघटना, व्यक्ती, हिस्ट्रीशिटर, हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन चेक करणेबाबत तसेच दहशतवादी कृत्यांच्या अनुषंगाने घातपात होणार नाही यादृष्टीने कोंम्बींग ऑपरेशन कारवाई दरम्यान नवीन बांधकाम चालु असलेली बिल्डींग, निर्जन स्थळांची जास्तीत जास्त चेकींग करणे बाबत आदेश दिले होते. तसेच नाकाबंदी चेकींग राबवुन संशयित वाहन चालकांना चेक करणे बाबत आदेश दिले होते व त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक १०/०१/२०२४ रोजी रात्रौ २२.०० ते दिनांक ११/०१/२०२४ रोजी ०२.०० वा. पर्यत कोंम्बींग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण १५४४ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ७१६ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

**परिमंडळ-१** मध्ये विशेष मोहिमे दरम्यान तडीपार आदेशाचा भंग केल्याने १ आरोपीस मपोका १४२ प्रमाणे १ केस करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे १० बेलेबल / नॉनबेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली. कोटपाचे १० खटले भरण्यात आले असुन विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ४ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

**परिमंडळ-२** मध्ये विशेष मोहिमे दरम्यान ८ बेलेबल / नॉनबेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली. जुगाराची १ केस करुन त्यात २ आरोपींकडुन रु. १७५०/- चे जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. तसेच दारुबंदीची ४ केस करुन ४ आरोपींकडुन रु. ३,५९०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ३ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

**परिमंडळ-३** मध्ये विशेष मोहिमे दरम्यान सिंहगड रोड पोस्टे ने आरोपी नामे प्रणव विनोद कुंभार वय १९ रा. बेनकर वस्ती, धायरी पुणे याचे ताब्यातुन ०१ गावठी पिस्टल व ०१ जिवंत काडतुस ४५,५००/- रु. चे जप्त करुन त्याचेविरुद्ध सिंहगड रोड पोस्टे गुरनं. १४/२०२४ आर्म्स ॲक्ट ३ (२५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. १४ बेलेबल / नॉनबेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली. जुगाराच्या २ केसेस करुन ११ आरोपींकडुन जुगाराचे साहित्य व रोख रु. ११,९८०/- चा माल हस्तगत केला. तसेच दारुबंदीची ७ केस करुन ७ आरोपींकडुन रोख व दारुचे साहित्य रु. ५,९५५/- असा मुद्देमाल जप्त केलेला आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ५ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे. तसेच कोटपाचे १५ खटले दाखल केले आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

**परिमंडळ-४** मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले ३ गुन्हयात ३ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. १९ बेलेबल / नॉनबेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली. तडीपार आदेशाचा भंग केल्याने २ आरोपीस मपोका १४२ प्रमाणे २ केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच दारुबंदीची ११ केसेस करुन ११ आरोपींकडुन रु. १०,०८०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. जुगाराच्या ७ केसेस करुन १३ आरोपींकडुन जुगाराचे साहित्य व रोख रु. १९,२७५/- चा माल हस्तगत केला. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ११ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे. तसेच कोटपाचे ७ खटले दाखल केले आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

**परिमंडळ- ५** मध्ये विशेष मोहिमे दरम्यान आ.ॲ.कलम ४/२५ प्रमाणे ३ केसेस करुन ३ आरोपीकडुन ३ कोयते रु. ३००/- चे जप्त करण्यात आलेले आहेत. तडीपार आदेशाचा भंग केल्याने १ आरोपीस मपोका १४२ प्रमाणे १ केस करण्यात आलेले आहेत. २७ बेलेबल / नॉनबेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली. तसेच दारुबंदीची ८ केस करुन ८ आरोपींकडुन रु. २०,२४०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ चालु असलेल्या ३३ आस्थापनांवर योग्य ती कारवाई केलेली आहे. तसेच कोटपाचे ४ खटले दाखल केले आहे.

**गुन्हे शाखेने केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

विशेष मोहिमे दरम्यान गुन्हे शाखा युनिट ६ यांनी आरोपी नामे स्वप्नील नागनाथ व्हणमाने वय २३, रा. शिवतेजनगर, काळेपडळ, हडपसर, पुणे यास अटक करुन त्याचे ताब्यातुन ४ वाहने जप्त करुन - हडपसर पो.स्टे. १) गुरनं. ५७/२०२४ क ३७९, २) गुरनं. १००/२०२३ क ३७९, ३) सिंहगड रोड पो.स्टे. ६५/२०२१ क ३७९, ४) शिक्रापुर पो.स्टे. ११५/२०२० क ३७९, हे ४ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले १ गुन्हयात १ आरोपी अटक करण्यात आलेला आहे. तडीपार आदेशाचा भंग केल्याने ६ आरोपीविरुध्द मपोका १४२ प्रमाणे २ केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच दारुबंदीची ६ केसेस करुन ६ आरोपींकडुन रु. २१,०२०/- चा गावठी हातभट्टी दारुचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- परिमंडळ ३, ४ व ५ मधील पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे एकुण गुन्हे शाखेने ६ केसेस करुन ६ आरोपींकडुन रोख व गावठी दारु असा रु. २१,०२०/- व पोलीस स्टेशनने ३१ केसेस करुन ३१ आरोपींकडुन रु. ६१,०३५/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १० केस करुन २६ आरोपींकडुन रु. ३३,००५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
- तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे एकुण ६ तडीपार गुन्हेगारावर कारवाई केलेली आहे.
- पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ३८८ हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच १२० एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.
- पोलीस स्टेशनकडुन नाकाबंदी दरम्यान १२२७ संशयित वाहन चालकांना चेक करुन ३०४ जणांवर रु. २,३२,६००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
- वाहतुक शाखेकडुन ९९९ संशयित वाहन चालकांना चेक करुन २९३ जणावंर वाहन धारकांवर कारवाई करुन रु. २,१२,१००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सह आयुक्त (अति.कार्यभार),मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-१,श्री.संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-३,श्री.संभाजी कदम, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५,श्री.आर.राजा, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी चेकींग राबवुन गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **एकुण कारवाया** | **अटक आरोपी** |
|---|---|---|---|
| १ | आर्म्स ॲक्ट ३/२५ | १ | १ |
| १ | आर्म्स ॲक्ट ४/२५ | ३ | ३ |
| २ | मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट | ३७ | ३७ |
| ३ | जुगार केसेस | १० | २६ |
| ४ | मपोकाक १४२ | ६ | ६ |
| **एकुण** | | **५७** | **७३** |